PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Hrudaysparshi
Year: 2000

Song: Labhe He Soukhya Ge
Lyricist: Nitin Akhave

लाभे हे सौख्य गे तुझ्यामुळे
लाभे हे सौख्य गे तुझ्यामुळे
लाभे हे सौख्य रे तुझ्यामुळे
तुझ्यामुळे
ओ...हो...गंध नवेजीवनी दरवळून आले
रंग नवे लेऊनी मोहरून गेले
गीत प्रीत रस भरून आले
तुझ्यामुळे
तुझ्यामुळे
लाभे हे सौख्य गे तुझ्यामुळे
तुझ्यामुळे

लाजणे तुझे बघून
लक्ष लक्ष चंद्र लाजले
ओ...गोड तुझ्या बोलण्यास चालण्यास
वागण्यास
मी रे खुळी भाळले
तुझ्यामुळे
तुझ्यामुळे
शब्द बोलताच तू मनात शुभ्र मोगरा फुले
ओ...बहर येई अंतरात तनमनात डोलतात
इंद्रधनूंचे झुले
तुझ्यामुळे
तुझ्यामुळे
तुझ्यामुळे
तुझ्यामुळे

तुझी नजर बोलकी
सांगते मला सखी
तुझ्या यशात मी सुखी
तुझ्या सुखात मी सुखी
तुझ्या यशात मी सुखी
तुझ्या सुखात मी सुखी
मी मनोमनी तृप्त जाहले
स्पर्श चांदणे तुझे मी प्राषिले
रोम रोम मंत्रमुग्ध झाले
तुझ्यामुळे
लाभे हे सौख्य गे तुझ्यामुळे
तुझ्यामुळे
लाभे हे सौख्य गे
लाभे हे सौख्य रे
तुझ्यामुळे तुझ्यामुळे
लाभे हे सौख्य गे
लाभे हे सौख्य रे
तुझ्यामुळे तुझ्यामुळे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*